# मिरारोड मधून ३५ लाखांचे अमली पदार्थ जप्त दोघे अटकेत



## मिरा भाईदर गुन्हेशाखेने केली जबरदस्त कारवाई, ड्रग्स माफियांचे कंबरडे मोडणार अप्पर पोलीस आयुक्त यांची ग्वाही!

विजय निमकर/वसई : वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हेशाखेच्या पथकाने मिरारोड मधून ३५ लाख रूपये किंमतीचे मेफोड्रॉन (एम डी) या अंमलीपदार्थाच्या मोठ्या साठ्या सह दोघांना अटक केली आहे. गुन्हे प्रगटी करण शाखेचे पो.ना.पाटील, मते व केंद्रे यांनी सोमवारी डेल्टागार्डन परिसरातून संशयास्पद रित्या दुचाकी वरून फिरणाऱ्या दोन इसमांना हटकले,अधिक चोकशी व अंगझडती घेतली असता आरोपी क्रमांक एक (नांवे गुप्त ठेवण्यात आली आहेत) यास कडून २०० ग्रॅम वजनाचे किंमत २० लाख रूपये तर आरोपी क्रमांक दोन यास कडून १५० ग्रॅम वजनाचे किंमत १५ लाख रुपये असा अंमलीपदार्थाचा मोठा साठा हस्तगत केला आहे. वरील दोघेही आरोपी अनुक्रमे १९,२० वर्षाचे असून गोळीबार रोड, सांताक्रूझ पूर्व येथील रहिवाशी आहेत. या दोघावरही काशिमिरा पोलीस ठाणे येथे एन.डी.पी.एस कायदा कलम ८/क, २१/क प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून मा.न्यायालयाने यांना २१ डिसेम्बर पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पुढील तपास सपोनि, योगेश देशमुख करीत आहेत. सदरची कामगिरी पोलीस आयुक्त वसई,विरार, अप्पर पोलीस आयुक्त मीराभाईदर, विजयकांत सागर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) जितेंद्र वेनकोटी, यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि.प्रविण स्वामी, विलास कुंटे, पोउपनि.चेतन पाटील, पो.ह. जनार्दन मते, शिवाजी पाटील, गोविंद केंद्रे, किशोर वाडीले, संतोष जगताप यांनी केली.